स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

आंतरजातीय विवाहीत जोडप्यावर सामाजिक वातावरनाचा होणारा परिणाम एक अभ्यास विषेष संदर्भ : मराठवाडा विभाग

“मानवविद्या शाखेअंतर्गत समाजकार्य या विषयात पि.एच.डी पदवी करीता सादर करण्यात येणारा लघु शोधप्रबंध“

संषोधक

धम्मपाल विठलराव वाढवे

एम.फिल (समाजकार्य)

सामाजिक शास्त्र संकुल स्वा.रा.ती.मराठवाडा

विद्यापिठ जि.नांदेड

मार्गदर्षक

प्रा.डॉ.अशोक वल्लेकर

जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय,

सिडको नविन नांदेड

२०१९-२०

आंतरजातीय विवाहीत जोडप्यावर सामाजिक वातावरनाचा होणारा परिणाम एक अभ्यास विशेष संदर्भ : मराठवाडा विभाग

प्रस्तावना :

भारतीय माणुस हा आपले सर्व जीवन समाज समुहामध्ये व्यतीत करतो. एखाद्या भुप्रदेशावरील समान जीवन पध्दती असणाऱ्यालोकांच्या समुहाला समाज असे म्हणतात. समाजातील लोकांच्या आचार–विचारात सारखेपणा असतो. समाजाचे एक निश्चित ध्येय असते. समाजाचे स्थैर्य आणि विकासासाठी लोकांमध्ये ऐक्याची भावना असणे आवश्यक असते. समाजात एकत्र राहिल्याने आपल्याला एकमेकांचा आधार मिळतो. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य यांच्या संबंधीत गरजा समाजाच्या माध्यमातून पूर्ण होतात.या गरजा भागविण्यासाठी आपण निसर्गातील साधन–संपत्तीचा वापर करतो. प्रत्येक व्यक्तीमध्ये नैसर्गिकच काही गुण व क्षमता असतात. व्यक्तींमधील गुणांचा आणि क्षमतांचा विकास समाजामुळे होतो. कुटुंब शाळा आणि अन्यसामाजिक संस्थामुळेव्यक्तीला आपला सर्वांगीण विकास साधण्याची संधी मिळते. लोकाशाही धर्मनिरपेक्षता आणि स्त्री–पुरूष समानता यासारख्या विचारांची ओळख समाजात होते.या विचारांची जोपासना करण्याचे प्रयत्न एकत्रिपणे व परस्पर सहकार्याने करता येतात. समाजाता सातत्याने बदल होत असताना, विज्ञान, तंत्रज्ञानातील प्रगतीचा आपल्या सामाजिक जीवणावर परिणाम होत असतो, अशा वेळेस चांगल्या विचारांचे आपण जतन केले पाहिजे. विज्ञान निष्ठा, मानवी हक्काची जोपासना, समता, सामाजिक पर्यावरणाचे, संरक्षण या स्वरूपाचा नवा विचार स्विकारला पाहिजे. समाजाची प्रगती व्हावी, असे प्रत्येकाला मनापासुन वाटले पाहिजे यातून न्याय व समतेवर आधारलेल्या समाजाची आपल्याला निर्मिती करता येईल. व्यक्ती हा समुह जीवन जगत असताना समाज रचना विकसीत होते आणि सामाजिक संस्था ह्या समाज संरचनेची अविभाज्य अंग असतात.[१]

विवाह संस्था ही अशीच समाज संरचनेतील आधारभुत संस्थापैकी एक महत्वाची संस्था आहे. मानवाच्या विविध गरजा भागविण्यासाठीच्या दृष्टीकोणातुन समाजामध्ये विविध सामाजिक

संस्थाचा उदयझालेला दिसून येतो. या विविध संस्थामधुन व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक, भौतिक गरजाची पुर्तता केली जाते. विवाह संस्थेचा मुळ पाया व्यक्तीच्या लैंगिक गरजाची पुर्तता करणे होय. या गरजा पूर्ण करण्यासाठी स्त्री–पुरूषांना एकत्रित यावे लागते. परंतु विवाह संस्थाची निर्मिती होण्यामागे शारीरिक गरजाबरोबरच सामाजिक रचना प्रस्थापित करण्याचा उद्देश असतो. या दृष्टिकोनातून रॉय असे म्हणतात की, 'सामाजिक संस्थेत सामान्य स्वरूपाची गरज सुव्यवस्थितपणे पूर्ण करण्यासाठी जी नियमने तयार केली जातात त्यास विवाह संस्था असे म्हणतात.'[२]

मानवाच्या विविध गरजांची पुर्तता करण्यासाठी विविध संस्था अस्तित्वात आल्या असल्या तरीही इतर संस्थेचया तुलनेत विवाह संस्थेचे स्वरूप अधिक व्यापक व विस्तृत असलेले दिसुन येते. ''समाजशास्त्रतीय दृष्टीकोनातुन सामाजिक संस्थेमध्ये संकल्पना मानवी गरजा व मानवा भोवतीचे पर्यावरण किंवा परिस्थिती दिर्घकालीन व सखोल अस्तीत्व आणि स्वरूप समाजाच्या सर्व स्तरातून होणारी त्यांची स्वीकृती, संस्कृती नुसार कार्य यांचा अंतर्भाव होतो. अशा प्रकारे सामाजिक संस्थाचे स्वरूप असे व्यापक व विस्तृत आहे हे विवाह संस्थेकडे पाहिल्यास लक्षात येते.''[३]

जगातील सर्व ज्ञात असलेल्या समाजामध्ये या सामाजिक संस्थेचे अस्तीत्व असलेले दिसुन येते, परंतु विवाह संस्थेचे स्वरूप सर्व समाजात सारखे असल्याने दिसुन येत नाही. काही समाजात एक स्त्री एक पुरूष, यांचा विवाह आदर्श मानला जातो तर काही समाजात एक पुरूष अनेक स्त्रियांबरांबर विवाह करतो तर काही समाजात एका स्त्रीचा विवाह अनेक पुरूषांबरोबर होतो. अशा प्रकारे विवाह प्रचलित होण्यासाठी सामाजिक, आर्थिक, भौगोलिक परिस्थीती करणीभुत असलेली दिसून येते.''[४]

''भारतीय विवाह संस्थेंचे स्वरूप हे काहिसे वेगवेगळे दिसुन येते. कारण भारतामध्ये या संस्थेला सामाजिकते बरोबर धार्मिकतेचेही अंग आहेत. स्त्री–पुरूषांमध्ये समाजमान्य होणारे पती–पत्नी संबंध निर्माण करून त्याच बरोबर त्यांचे नियमन करून समाजकल्यानाचे ध्येय साध्य करण्याचे महत्वपूर्ण कार्य विवाह संस्था करत असते.'' ज्या प्रमाणे विवाहाचे विविध समाजात वेगवेगळे प्रकार आढळून येतात त्याचप्रमाणे विवाह करणाऱ्यास्त्री–पुरूषांमधील बंधानाचे स्वरूप देखील समाजास्वरूप वेगळे असलेले दिसुन येते किंवा विवाहाच्या संबंधी असलेली निषेध–नियमने ही वेगवेगळी असलेली दिसुन येतात.

सर्वसाधारणपणे हिंदु धर्मात धर्मशास्त्रकारानी संपिड विवाहाचा निषेध केला असला तरीही भारतीय समाजात काही संपिड विवाह मान्यता पावलेले आहेत आणि भारतात ही बहुतेक सर्व जातीय–आत मागे भावंडाचया विवाहाची प्रथारूढ आहे. या प्रथेला मान्यताही आहे. बाम्हण्योत चित्पावत सोडल्यास कऱ्हाडे देशस्थ इ. सर्व पोटजातीत अशा भावंडाचे विवाह होतात. मात्र अशा विवाहात मुलगा बहिणीची व मुलगी भावाची असावी लागते. दक्षिण भारतातील काही या उलट म्हणजे भावाचा मुलगा आणि बहिणीची मुलगी असे विवाह घडून येतात. दक्षिण भारतातल्या काही जातीमध्ये मामा व भाची यांचाही विवाह होतो.''काही प्रमाणात काही जमातीत मुलगी मात्र थोरल्या बहिणीची असावी लागते. एकाच जातीतील किंवा पोट जातीतील व्यक्तीनी परस्परांशी विवाह करावा. असा नियम असलेला दिसुन येतो. कारण जातीसंस्था ही या समाज व्यवस्थेचे प्रमुख अंग आहे. जातिव्यवस्थेमुळे सामाजिक संबंधावर परिणाम झालेला दिसुन यतो.''

हिंदु धर्म म्हणजे जातिभेद आणि जातिभेद म्हणजेच हिंदु धर्म असे येथे समीकरण आज रूढझाले आहे. प्रत्येक जातीला आपण आपल्यापेक्षा दुसरीजात कनिष्ठ आहे असे वाटत असते. व श्रेष्ठतेच्या अहंकाराने कनिष्ठ वाटणाऱ्या जातीला असाह्यतेची वागणूक मिळत असते. याच आधारावर आंतरजातीय विवाहाला विरोध केला जातो. त्याच प्रमाणे रोटी–बेटी व्यवहारावर जातीचा देखील परिणाम झालेला दिसुन येतो. आणि म्हणुनच जात आणि विवाहाचा अतिशयजवळचा संबंध असलेला दिसुन यतो. कारण आपल्या जिवनातील प्रमुख व्यवहार व संस्कार जातीच्या चौकटीतच होतात अशा स्वरूपाची जातीची वैशिष्ट्येत्यांनी

अशी सांगितलेली आहेत की, जातीना पारंपारिक एक किंवा अनेक व्यवसाय असतात. तिचे इतर जातीच्या संदर्भात उच्च–निच कमी अधिक निश्चित स्थान असते. त्याचप्रमाणे प्रत्येक जातीने इतर जातीशी कसे वागावे या संबंधीची परंपरा असते. या सर्व घटकांचा परिणाम विवाहाच्या संदर्भात होतो. त्यामुळे व्यक्ती आपल्या जातीतला जोडीदार निवडतो. आज जाति निर्मुलनाचे कार्य होत आहे. परंतु ते देखील विशिश्ट क्षेत्रात होत आहे.

विवाहाच्या संदर्भात जाती संस्थेला आजही महत्वाचे स्थान आहे. हे आज विवाह जमवताना किंवा पार पाडताना लक्षात येते अशा प्रकारचा विवाह करण्याच्या संबंधीचा नियम समाजाने घालुन दिला असता तरी, धार्मिक बंधने असले तरीही स्मृतिकारांनी जरी सगोत्रसंप्रवर विवाहाचा निषेध केला असला तरीही असा निषेध वेदात सापडत नाही. संगोत्र विवाह निषीध्द का ठरला?या विषयी अनेक विद्ववानानी अनेककारणे दिली आहेत. सगोत्र विवाहाला प्रतिबंध केवळ भारतातच नाही. तर तो जगाच्या अनेक भागात आहे. परंतु औद्योगिकीकरण, नागरिकरण, शिक्षण, कायदे यांचा परिणाम म्हणुन आज स्त्री–पुरूष पारंपारिक विवाह संबंधी असलेल्या बंधनातून बाहेर येण्याचा प्रयत्न करत आहोत. यांचा परिणाम म्हणून आंतरजातीय विवाह कितपत योग्य आहेत हे जाणुन घेण्याचा संदर्भात संशोधन आंतरजातीय विवाहासंबधीचा अभ्यास हा प्रबंधात करण्याचा प्रयत्न केला आहे. या शोधप्रबंधात आंतरजातीय विवाह करणाऱ्या व्यक्तीकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन, आंतरजातीय विवाहाची आवश्यकता एकदंरित आंतरजातीय विवाह करणाऱ्या व्यक्ती विषयीचा अभ्यास संशोधकाने या शोध प्रबंधामध्ये करण्याचा प्रयत्न करेल. या संबंधीचा अभ्यास करण्यापुर्वी विवाह म्हणजे काय? किंवा आंतरजातीय विवाह म्हणजे काय? ह्या संकल्पना स्पष्ट होणे महत्वाचे आहे. या दृष्टीकोनातुन प्रथमच विवाहाचा अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न पुढील विवेचनात केला आहे.

१. विवाहाचा अर्थ :

''विवाह हा शब्द सर्वत्र प्रचलित असला तरी त्याचा निश्चित असा अर्थ सांगणे तसे अवघड आहे. विवाह हा शब्द संस्कृत भाषेच्या 'उव्दह'या शब्दापासुन तयार झालेला आहे, याचा अर्थ वधूला वराच्या घरी घेवून जाणे असा होतो.''[६] ''विवाह या शब्दाचा अर्थ असाही

सांगितला गेला आहे की, वि+वाह 'वि' म्हणजे विवाह व 'वाह' म्हणजेवाहुन नेने म्हणजे एकाने दुसऱ्याला आयुष्यभर गुण–दोषासह वाहुन नेणे किंवा स्विकारणे ही कल्पना ही या शब्दामागे असलेली दिसुन येते.''[७] ''हिंदु धर्मानुसार विवाह एक महत्वाचा संस्कार मानला जातो. या नुसार 16 वा संस्कार आहे. विवाह एक संस्कार असल्यामुळे विवाहच्छुक पुरूष आणि दपवर कन्या ब्राम्हण इष्टमित्र आणि अग्णी यांच्या साक्षीने पती–पत्नी म्हणून संबंध होतात, त्या संस्काराला विवाह असे म्हणतात.''[८] विवाह संस्थेच्या संदर्भात अनेक अभ्यासकांनी व विचारवंतानी आपापले वेगवगळे मत व्यक्त केले आहे. यामध्ये मार्शल जोन्स रिवर्स मॉर्गन, मुजुदमार, वेस्टर्न मार्क गिलीन आणि गिलीन इत्यादी विचारवंतानी विवाह संस्था या संदर्भात अभ्यास केलेला आहे. विवाहाचा अर्थ स्पष्ट करताना वेस्टर्न मार्क असे म्हणतात की,*"Marriage is a relation of one or more man to one more women which is recognized by cute me law"*म्हणजेच एक किंवा अधिक पुरूषांचा एक किंवा अधिक स्त्रियांशी येणारा असा संबंध की ज्याला कायद्याची किंवा समाजाची प्रथांची मान्यता असते यालाच विवाह असे म्हणता येईल.

विवाहामुळे एकत्रित येणाऱ्या स्त्री पुरूषांना परस्परांच्या संदर्भात काही अधिकार आणि कर्तव्य प्राप्त होतात. अशा स्वरूपांचा अर्थ वेस्टर्न यांनी सांगितलेला दिसुन येतो. यामधुन हे स्पष्ट होते की, विवाह म्हणजे स्त्री पुरूषांनी प्रस्थापित होणारा लैगिंक संबंध नव्हे तर या अनुषंगाने पती–पत्नी म्हणून त्यांना काही अधिकार आणि कर्तव्य ही प्राप्त होतात. या संदर्भात आणखी अशा स्वरूपांचा अर्थ सांगितलेला आहे."दोन भिन्न लिंगी व्यक्तींनी संततीसाठी अणि तिचे पालनपोशण करण्याच्या उद्देशाने समाजांच्या मान्यतेने स्थिर आणि सातत्य पूर्ण लैगिंक जीवण जगण्यासाठी कायदेशीर दृष्टया आवश्यक व समाजमान्य विधीचे पालन करून कौटुंबिक जीवनाची केलेली सुरूवात म्हणजे विवाह होय. आणि या विविध विधींचा उद्देष संबंधीत सामाजिक आणि सांस्कृतीक प्रथांचा समुच्चय म्हणजे विवाह संस्था होय."[९]

विवाह संस्थेच्या संदर्भात अर्थ स्पष्ट करतांना विल्स आणि हायजर यांनी देखील वेगळा अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे, यांच्या मते, विवाह ही सर्व समाजात

आढळून येणारी संस्था असली तरी समानरूप वेगळी बनल्यामुळे तिचे स्वरूप क्लिष्ट बनलेले आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या मते विवाह संस्थेव्दारे केवळ लैंगिक गरजांची पूर्तता होत नाही तर विविध गरजाची पुर्तताही या संस्थेव्दारे होत असते. सर्वसाधारणपणे विवाहाची कार्यात्मक दृष्टीकोनातून व्याख्या करताना बिल्स आणि हायजर असे म्हणतात की,*"marriage is every society"*याचा अर्थ असा होतो की, विवाह ही एक प्रत्येक समाजात आढळून येणारी क्लिष्ट अशी सांस्कृतिक घटना आहे. तिच्याव्दारे केवळ लैंगिक गरजेची पुर्तता होत नाही तर या संबंधातून निर्माण होणाऱ्यासंततीचे पालन पोषन करणे व त्यांच्या विविध गरजांची पूर्तता करणे ही कल्पना देखील विवाह संस्थेत अभिप्रेत आहे.

विवाह संस्थेसंबंधीचा व्यापक स्वरूपाचा अर्थ स्पष्ट करण्याचा हॉबेल यांनी man in primitive world या त्यांच्या ग्रंथामध्ये करण्याचा प्रयत्न केला आहे. हॉबेल यांच्या मते विवाहामुळे केवळ विवाह करणाऱ्या स्त्री–पुरूषांचा संबंध प्रस्थापित होत नाही तर विवाह करणाऱ्या या स्त्री पुरूषांचया नातेवाईकांशी त्यांना होणाऱ्या सतंतीशी विशिष्ट संबंध प्रस्थापित होतो. याच प्रमाणे विवाह करणाऱ्या या स्त्री–पुरूषांना धार्मिक सामाजिक बंधनाचे पालन करावे लागते. या दृष्टीकोनातून ते विवाहाची व्याख्या करतात.

२. आंतरजातीय विवाह म्हणजे काय?

वैदिक काळात आंतरजातीय विवाह हे प्रचलित होते ८ व्या शतकात सुध्दा याला कोणाचाच विरोध नव्हता. ९ व्या व १४ व्या शतकात सुध्दा विरोध नव्हता, पण १२ व्या शतकात थोडाफार होत होता. विरोध नव्हता परंतु अशुभ मानत होते. बौध्दकाळात धर्मानुसार कोणत्याही जातीतील पत्नीला जे उत्पन्न झालेले मुलांचे कोणत्याही संमती शिवाय वेगळे करतात तेव्हां यांचा उल्लेख केला जातो.

वैदिक आणि उत्तर वैदिक काळातील साहित्यांच्या माध्यमातुन हे आपल्याला कळते की, त्या काळी आंतरजातिय विवाहाचे नियम एकसमान विवाह संस्थेत होत होते. परंतु अनेक जाती धर्मानुसार विवाह केलाजात असे ब्राम्हण, क्षत्रीय, वैश्य, या सर्वाची वेगवेगळे अस्तितव असे काही नव्हते. कारण वर्गव्यवस्था असल्यामुळे आंतरजातीय विवाह होत होते. परंतु १० व्या शतकानंतर हे विवाह जटील तसेच गुंतागुंतीचे होत गेले. नंतरच्या काळात

धर्मशास्त्रानुसार व तेव्हांच्या कायंद्यातील दृष्टीकोनातुन आंतरजातीय विवाह अमान्य करण्यात आला.

३. विवाहाची उद्दिष्ट्ये :

''हिंदु धर्मग्रंथात हिंदु धर्माच्या विवाहाला एक वेगळा अर्थ आहे. विवाहाचा उद्देश कामवासनेची पूर्तता एवढाच सांगितलेला नाही. तर प्रजा प्रमुख उद्देश यामध्ये सांगितलेला आहे. धर्मप्रजा प्रज्ञासंपत्ती हे विवाहाचे प्रयोजन होय असे मिश्रीत करा म्हणतो. वापरा संबंधाचेही तेच मत आहे. समाजाचे अस्तित्व टिकावे त्यांचा उत्कर्ष व्हावा यासाठी समाजात सुप्रजा निर्माण व्हायची असेल तर, पती व पत्नी परस्परांवर अनुरक्त व कर्तव्यदक्ष असावी लागतात. लहानपणीच मुलांवर चांगले संस्कार झाले तर मोठेपणी ती समाजाला उपयुक्त ठरतील. त्यासाठी पती–पत्नींना धर्माप्रमाणे वागुन सुप्रजा निर्मितीची प्रात्रता मिळवायची असते विवाह संस्कार व त्या साठीच असतो विवाहातलेमंत्र व प्रार्थना ऐतद्विषयी असतात. वधूला हाती धरून अग्नीला प्रदक्षिणा करताना वराने म्हणावयाचा एकमंत्र आहे तो असा.''तावेन विवहाव है प्रजां प्रजनयाव है सं ज्रिया रोचिष्णू सुभ्मस्मानौ जीवंम शरद–शतमं.'' आपण विवाहबध्द होऊन प्रजा उत्पन्न करूया एकमेकांवर प्रेम करून एकमेकांचे आवडते होऊया एकमेकांविषयी शुध्दमन ठेवुन शंभर वर्ष जगुया''[१०]

''हिंदु विवाहात तिन उद्दीष्टे महत्वाची मानली जातात त्यांचे विवेचन पुढील प्रमाणे दिले आहे.

१. धर्म वृत वैकल्ये, धार्मिक आचरण यज्ञयाग इत्यादी पार पाडणे?
२. प्रजा व प्रजोत्पादन करणे स्वतःचे वंशज निर्माण करणे.
३. श्रती कामवासनेची तृप्ती करणे.

या तिन उद्देशांमध्ये धर्म हा या उद्देशाला विवाहाला अग्रस्थान दिलेले आहे. कारण त्याकाळात हिंदु समाजावर धर्माचा जबरदस्त पगडा होता. कारण हिंदु पुरूषांच्या जीवनाचे हेतु जरी आपण पाहिले तर तो धर्म, अर्थ, काम, मोक्ष असे चार पुरूषार्थ सांगितले आहेत.

म्हणजे हिंदु पुरूषांच्या जीवनांमध्ये तव्दतच विवाहामध्ये धार्मिक आचरणाला अग्रस्थान दिलेले आहे. मनुसहिंता किंवा पौराणिक ग्रंथात सुध्दा धर्म हेच प्रमुख उद्दिष्ट सांगितले आहे. त्यानंतर कुटुबांच्या आणि समाजांच्या दृष्टिकोनातून पुत्रप्राप्ती किंवा प्रजोत्पादन हे दुसरे उद्दिष्ट दिलेले आहे. पुत्र व पित्याला मोक्षपद प्राप्त करून अशी धार्मिक समजूत आहे. तिसरे स्थान विवाहात रती कामवासनेला देण्यात आलेले आहे. विवाहात रती कामवासनेला देण्यात आलेला आहे. विवाह विधी हा एक धार्मिक संस्कार मानण्यात आलेला आहे, हिंदु विवाहांमध्ये विवाह करार नाही तो संस्कार विधी आहे त्यामुळे विवाह विधी पूर्ण झाला हे तेव्हांच समजला जातो. जेंव्हा लाजाहोम पाणी ग्रहण सप्तपदी हे तीन धार्मिक विधी पार पाडल्या जातात, असे हे सर्व धार्मिक विधी अग्नीदेवतेच्या व ब्राम्हणांच्या साक्षीणे वैदिक मंत्राच्या सोबत होते. पती पत्नींचे सात पावले बरोबर चालण्यामागे सात जनू एकमेकांची सोबत करावयांची आहे. अशी एक उदात्त कल्पना केली आहे. विवाह ही एक महत्वाची संस्था आहे. मनुष्यांच्या पुर्तीसाठीच या संस्थेची निर्मिती झाली.

- **विवाहाची उद्दिष्ट्ये :**

कामवासना ही व्यक्तींची नैसर्गिक आणि स्वाभाविक भावना आहे. ज्या प्रमाणे सामाजिक अस्तित्व तयार होण्यासाठी विवाह संस्थेची गरज आहे. त्याचप्रमाणे मानवाचा व्यवस्थित विकास होण्यासाठी देखील या संस्थेची गरज आहे. हिंदु संस्कृतीत मोक्ष प्राप्तीची कल्पना अत्यंत महत्वाची आहे. समाजातील लैंगिंक संघर्ष आणि अनैतिकता कमी करण्याच्या दृष्टीने ही संस्था अत्यंत महत्वाची ठरली आहे. या संस्थेमुळे लैगिंक स्थैर्य प्राप्त झाले आहे. समाजातील स्त्री–पुरूषांचे लैगिंक संबंध ठरविण्याचा अधिकार याच संस्थेला आहे. म्हणुन या संस्थेची अत्यंत आवश्यकता आहे.

- **विवाहाची उद्दिष्ट्ये :**

विवाह संस्थेव्दारे केवळ शारीरिक संबंध निर्माण होतो. असे नाही तर मानसिक समाधान देखील प्राप्त होते पती पत्नींच्या नात्यांची ही एक कायम व्यवस्था आहे. समाजात

असलेल्या स्त्री–पुरूषांमध्ये शारीरिक आकर्षणाचा विचार समाजाने केला त्यातुन, विवाह संस्था निर्माण झाली त्यामुळे पुढील कुटुंब संस्था अस्तीत्वात येवून समान स्थैर्य निर्माण झाले.

- **आर्थिक समाधान :**

विवाह हे स्त्री पुरूषांच्या शारीरिक किंवा मानसिक समस्या सोडविण्याचे समाधान नसुन ते आर्थिक संघटन आहे. पती हा पत्नींचा आयुष्यभर सांभाळ करतो. कुटुंबाला लागणारे आवश्यक असणारे उत्पादन करतो. कुटुंबाच्या सर्व गरजा पुर्ण केल्या जातात विवाह झाल्यानंतर स्त्रींची संपूर्ण जबाबदारी पतीवर असते. मुलांचे पालन पोषण शिक्षण आणि इतर विकास करणे हे काम वैवाहिक जीवनातील एक भाग समजला जातो. कुटुंबातील सुख, दुःख संकटे इत्यादींचा त्या त्या परिस्थितीत योग्य निर्णय घेणे आणि कुटूंबात जास्तीत–जास्त सौख्य निर्माण करणे हे पती–पत्नी या उभयतांचे कार्य आहे. वरील सर्व परिस्थितींचा विवासंबंधीच्या परिभाषेच्या परिभाषेच्या आधारे विवाहाची प्रामुख्याने तीने उद्दिष्टे म्हणजे, कामवासनेची तृप्ती त्यांना होणाऱ्या संततीचे पालन, पोषण आणि परस्पर सहकार्य होय.

''विवाह संस्थेच्या संदर्भात डॉ.मरडॉक यांनी केलेल्या अभ्यासाचे महत्व दिसून येते. त्यांनी ही विवाहाच्या संदर्भातील हीच उद्दिष्टे महत्वाची मानली आहे. ''ऋग्वेदात जी विधाने केली आहेत त्यावरून असे दिसते की, ग्रहस्थाश्रम घेवून मनुष्याला देवाप्रित्यर्थ यज्ञ करता यावे आणि संपत्ती उत्पन करता यावी हाच विवाह करण्याचा असे स्मृतिकार आणि निबंध ग्रंथकारांच्या मताप्रमाणे धर्माचरण प्रजा आणि त्यांच्या अनुषंगाने नरकापासुन संरक्षण आणि रती संभोगजन्य आणि इतर सुखे हया गोष्टी प्राप्त होणे हे विवाहाचे तिन प्रमुख हेतू असतात.

हिंदु विवाह संस्थेचे स्वरूप आणि एकंदरित विवाहाची उद्दिष्टे या मध्ये देखील वेगवेगळेपण असलेला दिसुन येतो. हिंदु विवाह संस्थेची जडण–घडण वैदिक काळापासून सुरू झालेली दिसुन येते विवाहाच्या संदर्भात असे दिसून येते की, या पध्दतीमध्ये व्यक्ती स्वातंत्र्याला अधिक वाव दिलेला दिसुन येत नाही किंवा स्त्री पुरूषांचे हे बंधन अतुट असे मानले जाते आणि यामुळे हिंदु विवाह संस्थेचे स्वरूप वेगवेगळे बनलेले दिसुन येते. या

संदर्भात असे म्हणने विवाह संस्थेतील व्यक्ती स्वातंत्र्याचे स्थान आणि स्वातंत्र्याचे स्वरूप या दोन निकषावर जगातील वैवाहिक संस्थाचे वर्गीकरण करावयाचे झाल्यास एकामेंकाला व्यक्ती स्वातंत्र्याचा संपुर्ण अभाव आणि वैवाहिक संबंधाचे अतुटस्वरूप या निकषांवर आधारलेली परंपरागत हिंदु व्यवस्था आहे. तर दुसऱ्या टोकाला संपुर्ण व्यक्ती स्वातंत्र्यांचा पुरस्कार करणारे आणि वैवाहिक संबंधाचे स्वरूप संपूर्ण ऐच्छिक असावे.

असा आग्रह धरणारे पाश्चिमात्य समाजात सध्या रूझ असलेली आधुनिक विवाह संस्था असा फरक आज करावा लागेल. यावरून हिंदु विवाह संस्थेचे स्वरूप वेगवेगळे असलेले दिसुन येते याच दृष्टीकोनातून हिंदु विवाहाची उद्दिष्टे अनुक्रमे धार्मिक विवाह संस्थेकडे पाहिले जाते. या दृष्टीकोनातूनच विवाहाची उद्दिष्टये अनुक्रमे धार्मिक उद्दिष्टये, लैगिंक गरजांची पुर्तता, पुत्रप्राप्ती अशी असलेली दिसुन येते. हिंदु विवाह या संकल्पनेमागे प्रामुख्याने विवाहाची खालील तीन घटक असलेली दिसुन येतात.

१. धर्म :

परंपारिक समाजातील विवाहाचे उद्दिष्टये लक्षात घेता धर्म हे पहिले उद्दिष्टये मानले जाते असे यानुसार विवाहित व्यक्तींनी हिंदु धर्मातील अंतीम लक्ष ''मोक्ष प्राप्तीसाठी'' ग्रहस्थाश्रमात प्रवेश करणेपंच महायज्ञ करणे व विविध धार्मिक सामाजिक कर्तव्ये पार पाडणे कार्य यामध्ये अभिप्रेत आहे. पारंपारिक समाजामध्ये यज्ञाला पूर्णत्व पती व पत्नीशिवाय येत नाही. या कर्तव्य पालनांमध्येच ग्रहस्थाश्रमातील व्यक्तींवर ज्यांनी महत्वपूर्ण शास्त्र रचले अशा ऋषीचे त्याच प्रमाणे आई–वडींलाचे ऋण फेडल्याचे प्राणीमात्रावर दया करण्याचे त्याचप्रमाणे अतिथींची सेवा करण्याची जबाबदारी आणि ही जबाबदारी पार पाडण्याच्या दृष्टीकोनातूनच या पाच यज्ञाचे पालन करावे लागत आहे असे विवाहाच्या दृष्टीकोनांतुन महत्वाचा उद्देश मानला जात असे या संबंधीचे सविस्तर विवेचन पुढील प्रमाणे केले आहे.

''प्रत्येक हिंदु व्यक्तीला आपल्या जीवणात काही धार्मिक कर्तव्य पार पाडावी लागतात. त्या कर्तव्यांच्या पूर्तीसाठी विवाह केवळ आवश्यक असते. पत्नी शिवाय पुरूषांला पुर्णत्व येत नाही. आर्थिक कार्याकरीता विवाह केवळ आवश्यक नव्हे तर अनिवार्य आहे. हिंदु स्त्रीला धर्मपत्नी म्हणून संबोधलं आहे. कारण तिच्याशिवाय धार्मिक कार्य करता येत नाही.

याज्ञवल्याने पत्नींच्या मृत्यूनंतर यज्ञकार्यासाठी लागलीच दुसरा विवाह करण्याचा आदेश दिला आहे. अश्वमेध यज्ञाच्या वेळी सीतेच्या अभावी रामचंद्राला तिची सुवर्ण प्रतिमा करावी लागली.

हिंदु जीवणात धार्मिक कर्त्यव्यानाच यज्ञ म्हणले आहे व जीवन उद्दिष्टांच्यादृष्टीने या यज्ञांना विशेष महत्व आहे ब्रम्हयज्ञ, देवयज्ञ, भूतयज्ञ, पितृयज्ञ व अतिथियज्ञ हे पाच प्रमुख यज्ञ आहेत. ब्रम्ह यज्ञांचा उद्देश ज्यांनी महत्वपूर्ण शास्त्रे रचली आहेत. त्या ऋषीप्रती श्रध्दा व्यक्त करण्यांचा आहे. यज्ञपठन वेदाभ्यास किंवा वेदमंत्राच्या उच्चारणाने हा यज्ञ पूर्ण करावयाचा असतो.

पितृयज्ञ आपल्या पर्वजाचे आपल्या वर जे ऋण आहे त्या ऋणापासून मुक्त होण्यासाठी पितरांना पिडंदान करून हायज्ञ केला जातो. पिंडदान करण्याचा अधिकार प्रामुख्याने मुलालाच असल्यामुळे पितृऋणापासुन मुक्त होण्यासाठी ग्रहस्थाश्रम किंवा विवाह आवश्यक मानला जातो. भुतयज्ञ हा यज्ञ प्राणिमात्राशी संबंधीत आहे यात व्यक्तीने ते स्वतः च्या भोजनाबरोबर इतर प्राणीमात्रावस्था भोजनाची किंवा पालनाची काही प्रमाणात जबाबदारी स्विकारायची, ब्रम्हचारी, स्वतःहा बरोबर व्यवस्थाकरणे ग्रहस्थाश्रमाचे कर्तव्य मानले आहे.

अतिथीयज्ञात अतिथीच्या आदर सत्काराचा समावेश होतो. अपेक्षीत रितीने येणाऱ्या व्यक्तीचा आदर सत्कार हे ग्रहस्थाश्रमाचे कर्तव्य मानले आहे व या सत्कारात पती बरोबर पत्नी असणे देखील महत्वाचे आहे. अशा रीतीने या पंच महायज्ञासाठी विवाह महत्वाचा आहे तैतरिय ब्राम्हण्यानुसार पत्नी नसणाऱ्या पुरूषाला यज्ञाचा अधिकार नाही. हिंदु धर्म शास्त्रानुसार व्यक्ती करीता ग्रहस्थाश्रम महत्वाचा मानला गेला आहे. कारण याच काळात तो ऋषीच्या, समाजाच्या आणि आपल्या पूर्वजाच्या ऋणापासुन मुक्त होवु शकतो. हिंदु धर्मानुसार कर्तव्यपालन म्हणजेच धर्म यज्ञ हा शब्ददेखील कर्तव्याचे पालन याच अर्थाने वापरला आहे. समाजाचा सदस्य म्हणून व्यक्तीला समाजा करीता जी कर्तव्य पार पाडवी लागतात त्या करीता विवाह आवश्यक मानला आहे. ऋषीच्या पित्याच्या व समाजाच्या ऋणातुन मुक्ती मिळवण्या करीता ग्रहस्थाश्रम महत्वाचा आहे. हा याच दृष्टीकोणातून धर्म हा एक विवाहाचा महत्वाचा उद्देश आहे. सर्व विवेचना वरूण पारंपारिक हिंदु विवाहाच्या उद्दिष्टाची कल्पना येते.

२. **प्रजा :**

हिंदु विवाहांच्या दृष्टीकोनातून दुसरा प्रमुख उद्देश पुत्र प्राप्ती किंवा प्रजा हा आहे. मोक्ष प्राप्तीच्या दृष्टीकोनातून हे उद्दिष्ट महत्वाची मानली जाते पुत्र हा व्यक्तीला नरकात जाण्यापासुन वाचवतो अशी कल्पना ही महाभारतात आलेली आहे. त्यामुळे पुत्र प्राप्ती शिवाय स्त्री पुरूषांच्या जीवनाला पूर्णत्व येत नाही असे मानले जात असे. विद्या अभ्यास संपल्या नंतर गुरूआपल्या स्नातकांना असा आदेश देत असतो की, प्रजा तन्तु या व्यवच्छेत्सी ''प्रजात्पादनाचा कम भंग करू नका, ज्या प्रमाणे तुमचे पूर्वज आपली संपती ठेवुन गेलेत त्याचप्रमाणे तुम्हीही आपला वारसा ठेवून जा.''त्याचप्रमाणे विवाह प्रसंगी देखील विवाह मंत्रात ''उत्तम संततीकरीता मी तुझा स्विकार करतो असा वर वधुला म्हणतो. तसेच अग्नीची पूजा करताना देखील आम्हाला उत्तम संतती दे अशी प्रार्थना वधु वर करतात.

पुत्र प्राप्तीचा उद्देश केवळ पती पत्नीच्या संदर्भातच घेतात असे नव्हते तर या मागे सामाजिकदृष्टीकोन देखील असलेला दिसुन येतो. कारण पुत्र प्राप्तीवरच समाजाचे सातत्य अवलोकन आहे याचा ही विचार हया उद्देशामध्ये केलेला दिसुन येतो. कारण पुत्र प्राप्तीवरच समाजाचे सातत्य अवलोकन आहे याचा ही विचार हया उद्देशामध्ये केलेला दिसुन येतो. आणि म्हणून महाभारतामध्ये किंवा मनुस्मृती मध्ये असा उल्लेख आढळतो. या उद्देशाच्या संदर्भात पुढील विवेचन महत्वाचे ठरते म्हणून यांचा उल्लेख या अभ्यासात केला आहे. समाजाचे सातत्य कायम ठेवण्याची कल्पना या मागे आहे. समाजाला नवीन सदस्य देवून समाजाचे सातत्य कायम ठेवणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य मानले आहे. म्हणूनच महाभारतात पुरूष संतती उत्पन्न करीत नाही तो पापी मानला गेला आहे. मनुस्मृतीत देखील प्रत्येक विवाहातून व विवाहापासून येणारी संतती किती पिढयांचा उध्दार करते याचे विवेचन या उद्देशात सामाजिक कर्तव्याची जाणीव प्रमुख मानली गेली आहेत.[१३]

यावरून पारंपारिक विवाहात पुत्र प्राप्ती किंवा प्रजा या संबंधीचे महत्व लक्षात येते. आज ही पुत्र प्राप्ती महत्वाची मानली जाते. तिला पारंपारिक समाजा इतके महत्व नसले तरी

मुल नसलेले अनेक स्त्री पुरूष मुलासाठी नवस करताना आढळुन येतात. एवढेच नव्हे तर मुली असल्या तरी मुलगा असल्याशिवाय पुत्र प्राप्तीला पूर्णपणे मानले जात नाही.

३. रती :

हिंदु विवाहाचे तिसरे व महत्वाचे उद्दिशट म्हणून ओळखले जाते. आर्थीक उद्देश मानला गेला असला तरी ही ती एक सामाजिक गरज आहे आणि म्हणून हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे या उद्देशाला महत्वाचे स्थान दिले आहे. हिंदु धर्मातील ''गिता'' या धर्मशास्त्रामध्ये ही यांचे महत्व सांगितले आहे. ''श्री कृष्णाने गितेत धर्मानुकुल काम सांगितले असुन परस्त्री बरोबर संभोग निषिध्द मानला आहे. इतकेच नव्हे तर संभोग देखिल पुत्र प्राप्तीसाठी सांगितला आहे.

या उद्देशानुसार रती किंवा कामवासना हे महत्वाचे मानले असले तरी या मध्ये दोन महत्वाच्या बाबी मानल्या गेल्या आहेत. १)पुत्र प्राप्तीसाठी काम तृप्ती सांगितलेली आहे.२)या उलट व्यक्तीगत सुखाला दुय्यम स्थान दिले आहे पत्नी व्यतिरिक्त इतर स्त्रियांशी संभोग निषेध मानला गेला आहे. आधुनिक समाजामध्ये या संदर्भात परिवर्तन झालेले दिसुन येते. पारंपारीक समाजात हे उद्दिष्टये तिसऱ्या प्रकारचे मानलेले होते. परंतु आज धर्म हे उद्दिष्टये तिसरे मानले गेले आहे. रती या उद्देशाला अप्रत्यक्षरित्या महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. या प्रमुख उद्देशाशिवाय विवाह संस्थाची इतर उद्दिष्टये महत्वाची मानली आहेत. त्याचे विवेचन आपण पुढीलप्रमाणे करणार आहोत.

४. कुटुंबाची कार्य :

वास्तविक पाहता विवाह म्हणजे समाजमान्य मार्गाने कुटुंब स्थापनेचा समाज संमत मार्ग होय. या कुटुंब संस्थेच्या मार्फत त्या व्यक्तीवर अवलंबुन असणाऱ्या व्यक्तींचे पालन पोषन करणे ही त्या कुटुंबप्रमुखाची जबाबदारी असते. त्याचप्रमाणे कौटुंबिक परंपरा, प्रथा, संस्कृती यांचे पालन करण्याच्या दृष्टिकोनातुन ही कुटुंबाची भूमिका महत्वाची ठरते. या उद्देशाचा प्रजा किंवा पुत्र प्राप्ती या उद्दिष्टांशी असलेला दिसुन येतो. कारण ''अपत्य प्राप्ती शिवाय वैवाहिक जीवणाला पूर्तता येत नाही.'' स्त्री पुरूषांना विवाह होणे यातूनच कुटुंबाची स्थापना होते.

५. व्यक्तीमत्वाचा विकास :

व्यक्तीमत्वाचा विकास करणे हे देखिल एक महत्वाचे उद्दिष्टये म्हणुन सांगितले जाते या संबंधिचे महत्व सांगताना असे म्हटले जाते की, ''समाजमान्य मार्गाने लैगिंक इच्छाची तृप्ती सर्व सुःख–दुःखात नेहमी सोबत करणारी पत्नी व उपभोगाबरोबरच त्यागाची भावना या सर्व बांबी विवाहित व्यक्तींने व्यक्तीमत्व सुदृढ ठेवण्याच्या दृष्टीने साहययुक्त ठरतात. तसेच मुलांची योग्य मानसिकता वाढ होण्याच्या दृष्टीने माता पित्याचे संबंध देखील महत्वाचे असतात. अशा प्रकारे या त्याच पध्दती सुसंस्कृत समाज निर्माण करण्याचे महत्वाचे साधन मान्य होय.

अशा प्रकारे या उद्देशाला संदर्भात सांगता येईल वरिल सर्व विवेचनावरून एकंदरीत विवाहाची उद्दिष्टे सांगितली आहे.

६. आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देणारे घटक :

आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देणारे घटक पुढीलप्रमाणे नमुद केले आहेत.

१. शिक्षण आणि विज्ञान वादी दृष्टीकोन :

शिक्षणामुळे मानव सत्य काय आहे व याची चिकित्सा करत आहे. सत्य काय यांचा विचार शिक्षणामुळे तो विचार करावा लागतो व वैज्ञानिक दृष्टिकोन बुध्दीच्या कसोटीवर ते श्रध्दा व अंधश्रध्दा यात काय आहे. अंधश्रध्देला थारा देत नाही. यामुळे आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन मिळत आहे.

२. संदेशवहन व संपर्काचे साधन :

आज जनसंपर्काच्या साधनांचा वापर मोठया प्रमाणात होत आहे. त्यामुळे मानूस कितीही दुर जरी असला तरी हे साधनांमुळे त्यांच्या संपर्क ठेवण्याचे मोठे कार्य केले आहे. त्यामुळे स्त्री पुरूष संबंध जवळ आले आहेत. व यामुळे एक सुखद वातावरण निर्माण होत आहे. जरी जातीचे बंधन कठोर असले तरी ते एकत्र राहण्यासाठी जरी दुर

असले तरी एकमेकांपासुन उदा. फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विट्र, फोन मेसेज इत्यादी गोष्टींचा वापर करून आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन प्रभावी बनवित आहेत.

३. विज्ञानवादी विचार धारेचा प्रभाव :

विज्ञानाचा एक प्रभाव आंतरजातीय विवाहीत जोडप्यांवर प्रभावित करत आहे. कारण जाती–व्यवस्था, प्रथा–परंपरा ज्या घटकांवर आधारित आहेत त्या विज्ञानाच्या कसोटीवर ते निरर्थक सिध्द होतांना दिसुन येते. त्यामुळे अनुवंशाचा सिध्दांत जन्मांवर आधारित व उच्च व निच्च हे भेदभाव विज्ञान स्विकारत नाही.

७. समाजसुधारकांचा प्रभाव :

आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देण्यासाठी मोठे योगदान हे समाज सुधारक व नेते मंडळीचे आहे. हे त्यांचे श्रेय सामाजिक व धार्मिक सुधारना यांच्यात देखील आहे. आर्य समाजाचे प्रचारक व समर्थक स्वामी दयानंद सरस्वती, ब्राम्हो समाजाचे संस्थापक राजा राममोहन रॉय, शिख धर्माचे संस्थापक गुरूनानक ते गुरूगोविंदसिंघ, रामकृष्णमिशनचे संस्थापक स्वाम रामकृष्ण परमहंस आणि प्रचारक, महात्मा फुले, संत कबिर, गौतमबुध्द, महात्मा बसवेश्वर, संत रोहिदास मधुराज, छत्रपती शिवाजी महाराज, शाहु महाराज, डॉ.बाबासहेब आंबेडकर हे राष्ट्रनिर्माते व राष्ट्रीय ने मंडळीच्या त्या सामाजिक कार्यात व प्रेरित होवून सुध्दा आंतरजातिय विवाह करण्यास तरून तरूणी एकत्र येत आहेत. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास समाज सुधारकांच्या विचाराचा अभ्यास व त्याचा विचारांचा परिणाम हा आंतरजातीय विवाह घडवून आणल्यास महत्वपूर्ण ठरत असल्याचे आपल्याला सांगता येते.

८. संपतीला महत्वः

आजकाल संपत्तीला महत्व जास्त प्राप्त झालेले आहे. म्हणून जातीचे महत्व कमी होत चालले आहे. यामध्ये कोणती व्यक्ती आपलय मनाप्रमाणे जीवन जगु शकते कोणत्याही मुली–मुलासोबत वा कोणत्याही जातीतील मुला–मलीसोबत आपला विवाह

करू शकतो आणि समाजात सन्मानाने ताट मानाने जगु शकतो. यामुळे धन–संपत्तीमुळे व सांस्कृतीक व परंपरागत असणाऱ्या गोष्टीचे महत्व कमी होत आहे. आपल्या मनाप्रमाणे शाही विवाह करीत आहेत. त्यामुळे परंपरागत विवाह संस्थाचे परिवर्तन होत आहे. हे मात्र तेवढेच खरे आहे.

९. प्रौढ विवाह पध्दतः

सर्व प्रौढ अवस्थेत सर्व युवा–युवतीला आपल्या विवाह संबंधीचा विचार विनीमय करण्यास संधी व अधिकार दिले जातात. याचा अर्थ प्रौढ अवस्थेत स्वातंत्र्य असतात ते आपले जीवन कसे जगले पाहिजे यांचे आकलण त्यांना आलेले असते. देशाचा पंतप्रधान कोणाला करायचे, राज्याचा मुख्यमंत्री कोणाला बनवायचे, यांचा निर्णय ते स्वतः घेऊ शकतात, त्यामुळेच प्रौढ विवाह पध्दतीमध्ये साथीदार निवडण्यांचा अधिकार तसेच मुभा त्यांना देण्यात आली आहे.

१०. चित्रपटांचा प्रभाव :

आजच्या नविन पिढीवर चित्रपटांचा प्रभाव व त्यातील चित्रपटांच्या कहानीचा मोठा असा प्रभाव आहे. चित्रपटांमधील कलाकारांचा वेषभुषेचा प्रभाव, केशरचनेचा प्रभाव आज समाजावर त्याचा बऱ्याच प्रमाणात प्रभाव आढळुन येत आहे. कारण चित्रपटातील नायक–नायिका यांचा सुध्दा आंतरजातीय विवाहाला चालना व प्रेरणा मिळत आहे.

११. आंतरजातीय विवाह कायदा :

आंतरजातीय विवाह कायदा करण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला. कायदा पास करण्यासाठी अनेकांनी मोठया प्रमाणात सहकार्य केले आहे, परंतू संकुचित विचारसरणीचे व असमतावादी मोठया नेतेमंडळीनी यांचा विरोध मोठया प्रमाणात केला. त्या विरोधक मंडळीचा आज मोठे आदर्शवादी नेते म्हणून त्यांचा गौरव होत असेल तर तो निंदनीय आहे. विशेष विवाह अधिनिरूम १८७२मध्ये संशोधन करून आंतरजातीय विवाहाला मान्यता देण्यात आली. १९३८मध्ये आर्य समाज विवाह कायदा मान्य

केल्यानंतर या कायद्यांची प्रेरणा घऊन याच प्रकारचा कायदा १९४९ला हिंदु विवाह कायदा/अधिनियम पारित करण्यात आला, याच अधिनियमाच्या अंतर्गत सर्वच विवाह मान्यता देण्यात आली आहे. जे कोणी कोणत्याही धर्माचे, जातीचे पंथाचे, किंवा जाती उपजातीमध्ये कोणीही कोणत्याही जातीचा असला तरी त्या सर्व व्यक्तीना या कायद्याने बंधने ठेवले नाहीत. हिंदु विवाह अधिनियम १९५५ पास झाला. व या कायद्याच्या दृष्टीकोनातुन आंतरजातीय विवाहाला मान्यता देण्यात आली आहे.

१२. संदर्भ साहित्याचा आढावा :

आंतरजातीय विवाहाच्यासंदर्भात अलिकडच्या काळात फार मोठया प्रमाणात अभ्यास झालेला दिसुन येत नाही असे असले तरी त्या संदर्भात काही विचारवंतांनी आंतरजातीय विवाहाच्या संदर्भात अभ्यास केलेला आहे. यामधून एकंदरीत आंतरजातीय विवाहाचे स्वरूप किंवा परिणाम या संबंधीची कल्पना येते. या मध्ये प्रामुख्याने सी.टी.कन्नन यांनी आंतरजातीय विवाहा संबंधीचा त्यांनी केला P.hD पदवीसाठी केला. Intercast and Inter Community Marrigesया शोधप्रबंधात त्यांनी 200 आंतरजातीय व आंतरप्रांतीय विवाहाची पाहणी केलेली आहे. या संशोधकानी असा हा निष्कर्ष मांडला आहे. स्त्रीयांच्या शिक्षणाच्या वाढत्या प्रभावामुळे ही विवाहाच्या संख्यात वाढ होत आहे. वयाचा परिणाम आंरजातीय विवाहाच्या संदर्भात दिलेला आहे.

१२.१ प्रदिप गोखल आणि पंडीत विद्यासागर :

यांनी आंतरजातीय विवाहाचा वेगवेगळया पध्दतीने अभ्यास केला आहे. 12 एप्रिल 1989 रोजी जातीय निर्मुलन संस्थेचे आंतरजातीय विवाह आणि समाज परिवर्तन या विषयावर एका परिसंवादाचे आयोजन केलेले होते या आधारावरच एक छोटी पुस्तीका काढली होती, त्यात या अभ्यासातुन आंतरजातीय विवाहाला समाजात अनुकुलता निर्माण व्हावी या दृष्टीकोनातून या पुस्तकेतून आंतरजातीय विवाह करणाऱ्या सामाजिक, राजकीय क्षेत्रात आणि उच्च पदावर असणाऱ्या लोकांची मते मांडलेली दिसुन येतात. या पुस्तकांमध्ये त्यांनी अनेक मान्यवर लोकांनी आंतरजातीय

विवाह केल्याचे उल्लेख करून आंतरजातीय विवाहाच्या संदर्भामध्ये अनुकुल असा दृष्टीकोन निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. एवढेच नव्हे तर लहान जातीमध्ये वारंवार विवाह होत राहिले तर त्या जातीत जन्माला येणाऱ्या संपत्तीवर शारीरिक व मानसिक परिणाम होतात या उलट आंतरजातीय विवाहामुळे संततीवर चांगले परिणाम होतात. असे हे पुस्तीकेत नमुद केले आहे.

१२.२ अनिल थत्ते आणि रामकृष्ण मोर :

यांनी देखील आंतरजातीय विवाहा विषयीचा अभ्यास केलेला आहे. यामध्ये त्यांनी आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन मिळण्यासाठी मंडळ व संघटना स्थापन करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केलेत्र त्याचप्रमाणे सामुदायिक पध्दतीने अशा प्रकारचा विवाह झाल्यास प्रस्तापित होईल व या विवाहला न्याय मिळेल असाही निष्कर्ष त्यांनी आपल्या अभ्यासत मांडला आहे. एवढेच नव्हे तर आंतरजातीय विवाह म्हणजे जातीभेद निर्मुलनांच्या अभियानाचे एक महत्वाचे साधन मानले जाते. म्हणून या विवाहाकडे पाहिले पाहिजे या संदर्भात त्यांनी राजकीय कामगार संघटना सामाजिक संस्था महाविद्यालय विद्यापिठ या सर्वांनी या अभियानामध्ये सहभागी झाल्यास या विवाहाच्या संदर्भातील अनुकुलता वाढु शकते.

वरील सर्व विचारवंतांनी आंतरजातीय विवाहा विषयीचा अभ्यास केला आहे. या अभ्यासाचा उपयोग आमच्या या संशोधनाला होउ शकेल या दृष्टीकोनातून सर्व अभ्यासकांचा आढावा घेतला आहे. या अभ्यासाचा आम्हाला आमच्या संशोधनामध्ये गृहितकृत्यासाठी बराच उपयोग झाला आहे.

१२.३ सी.एस.पाटील :

यांनी देखील आंतरजीय विवाहासंबंधीचा अभ्यास केला आहे. मुंबईतील कनिष्ठ वेतन गटातील लाकांची त्यांनी अभ्यास केला आहे. त्यांनी केलेल्या पाहणीत त्यांना या गटातील ७१ टक्के लोक आंतरजातीय विवाहास अनुकुल असल्याचे दिसुन आले आहे. बहुतांश व्यक्तीने आंतरजातीय विवाहांची अनुकुलता दर्शवली असली तरी

प्रत्यक्ष विवाह हे अत्यंत कमी प्रमाणात होतात असेही त्यांनी आपल्या अभ्यास नमुद केले आहे.

१२.४ पी.एन.प्रभू :

सी.एस.पाटील यांच्या प्रमाणेच मुंबईतील औद्योगिक कामगारांच्या संदर्भात आंतरजातीय विवाह विषयीच्या दृष्टीकोन जाणून घेण्याच्या संदर्भात त्यांनी संशोधन केले आहे. त्यांनी केलेल्या या नमुना पाहणीत 54.63 टक्के स्थलांतरीत औद्योगिक कामगारांनी जाती बाहेर विवाह करण्यास हरकत नाही असे नमुद केले आहे. त्यांच्या या अभ्यासात त्यांनी असे नमुद केले आहे. आंतरजातीय विवाहास तात्विक दृष्टीकोनातून अनुकुलता दर्शविवणे व प्रत्यक्षात विवाह करणे यांच्यात फार मोठी तफावत आढळुन येते. आंतरजातीय विवाहाची संख्या अत्यंत कमी असलेली दिसुन येते.

१२.५ जी.बी.देसाई :

यांनी आंतरजातीय विवाहाचा अभ्यास करत असताना 100 गुजराती स्त्रियांची पाहणी केली आहे. त्यांनी केलेल्या पाहणीत 45 टक्के स्त्रियांनी आंतरजातीय विवाहास अनुकूलता दर्शवलेली आहे. या संशोधनातून त्यांनी जातीय बंधनातून हळुहळु परिवर्तन होत आहे असे मनुद केले आहे.

१२.६ डॉ.पी.आर.मोकाशी :

यांनी देखील आंतरजीय विवाहसंदर्भात अभ्यास केला आहे. आंतरजातीय विवाहा संबंधीचा अभ्यास करतांना त्यांनी खालील टप्प्याच्या आधारे अभ्यास केला आहे.

१. इ.स.१९७५-७६ या वर्षे पूर्ण जिल्हयातील ५ हजार वर नोंदणी करण्यात आलेल्या विवाहावर आधारीत त्यांनी या संबंधीत अभ्यास केला आहे.

२. यानंतर डॉ.मोकाशी जे.एस.रणदिवे आणि आर.डी.नाईक यांनी मुंबई येथील विवाह नोंदणी अधिकाऱ्यांच्या कार्यालयातील १९७२ मध्ये विवाह कायद्याखाली नोंदविण्यात आलेल्या 250 च्यावर आंतरजातीय व आंतरधर्मिय विवाह करणाऱ्या व्यक्तींच्या मुलाखतींच्या आधारे अभ्यास केला करण्यात आला आहे. P.R.Mate Selection in inter marriages in Bombay या शोध प्रबंधांत त्यांनी आंतरजातीय विवाहितांच्या संबधीचे महत्वपुर्ण निष्कर्ष मांडले आहेत.

३. तिसऱ्या अभ्यासांमध्ये त्यांनी आंतरजातीय विवाह करणाऱ्या दलित सवर्ण जोडप्यांच्या मुलाखती घेउन त्यांनी भोगलेल्या अपेष्टा व आनंद या संबंधीचा समाज शास्त्रीय दृष्टिकोनांतुन अभ्यास केला आहे.

१३. संशोधन पध्दती :

संशोधन विषय ठरल्यानंतर विषयाची माहिती कशी गोळा करायची ही संशोधनाची पहिली पायरी आहे. संशोधन कर्त्यांनी, ***''आंतरजातीय विवाहीत जोडप्यांवर सामाजिक वातावरणाचा परिणाम एक चिकित्सक विशेष संदर्भ मराठवाडा विभाग''*** असा निवडला प्रस्तुत विषय सामाजिक समस्या व देशाच्या विकास समाज परिवर्तनाला व मानवी अधिकाराच्या संबंधीत आहे.

१३.१ संशोधन म्हणजे काय?

संशोधन हा शास्त्रीय पध्दतीचा अवलंब करून बुध्दीनिष्ठ आणि व्यावहारिक अशा प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्याचा एक प्रयत्न आहे.अनुभव कक्षेत येणाऱ्या घटकातील उत्तरे मिळण्याची शक्यता वाढावी याच उद्देशाने शास्त्रीय पध्दतीचा विकास झालेला आहे. सत्याचे आकलन होण्यासाठी दुसरा पर्यायच नाही. संशोधनावरील व्याख्या लक्ष्यात घेवुन संशोधनासाठी निवडलेल्या विषयांची इतभुत माहिती कशी संकलित करावी या प्रश्नाला अनुसरून आराखडा कसा निवडता येईल यांसाठी संशोधनकानी विचार केला.

१४. समस्या सुत्रण :

या विषयाची निवड कशी व का करण्यात आली.

१. मराठवाडयातील विभागातील आंतरजातीय विवाहीत सामाजिक वातावरणाचाजोडप्यावरील सामाजिक पर्यावरणाचा होणारा परिणाम शोधून काढणे.
२. सामाजिक पर्यावरणाचे दुःख भोगलेल्या मराठावाडा / मराठवाडयातील अस्वस्थता व असमतोल निर्माण करणाऱ्या सामाजिक परिणामांची कारणे शोधुन काढणे.
३. आंतर जतीय विवाहाच्या नावाखाली ओनरकालिनच्या घटणा मोठया प्रमाणात घडत आहे. यांचा अभ्यास करणे.
४. आंतर जातीय विवाह हे एक मात्र घटक आहे की भारतातील जातीप्रता नष्ट करण्याचा व समता मुलक समाज निर्मितीचा एक प्रयत्न आहे.

महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीतील काम करणारा मराठवाडयाचे करत असताना संशोधकाला जाती विषयीचे चटके बसलेले आहेत. या जातीव्यवस्थेचा पगडा दिसु नये म्हणून फुले, शाहु, आंबेडकर यांच्या समतावादी चळवळीचा प्रभाव संशोधनावर पडला व त्याच क्षणापासून संशोधकाने स्वतः विवाद करायला सुरूवात केली. व त्यामुळे संशोधकाला स्वतःच्या कुटुंबातुन, समाजातुन विरोध व्हायला सुरूवात केली. व त्यामुळे संशोधकाला स्वतःच्या कुटुंबातून, समाजातुन विरोध व्हायला सुरूवात झाली. याचा परिणाम असा झाला फुले शाहु, आंबेडकराच्या विचारांच्या फेऱ्यात येवून बसलो व स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे लोक अश्यावेळी विचार करतील आंतरजातीय विवाह म्हणजे दुसरे राष्ट्रीय एकात्मतेचे साधन होय. काही नेतेमंडळी व कर्मचारी जातीय विवाह करून दुसऱ्यांना आंतरजातीय विवाह करण्यासाठीचे पोकळ भाषणे देतात स्वतः मात्र जातीय विवाह करून बाजुला होतात. समाजपरीवर्तनाच्या चळवळी ही महत्वाची ठरली असुन त्यामुळे हिंदु समाजातील विवाहसंस्थेत जोडीदार निवडीवर बंधणे शिथील झाली आहेत. त्यातुन आधुनिक समाजातील तरूण तरूणी जातीच्या बाहेर जावून जोडीदार निवडू लागली आहेत, त्यातूनच आंतरजातीय विवाहाला चालना मिळत आहे. धर्म, जात,

पंथ यांचा पगडा समाजातुन कमी व्हावा व लोकांमध्ये एकता निर्माण व्हावी. अनेक जाती एकत्र याव्यात देशात एकोप्यांची भावना व्हावी यासाठी आम्ही प्रयत्नशिल आहोत.

आधुनिक परिवर्तनातुन विवाहाच्या वेगवेगळया भागात परिवर्तन होऊन आंतरजातीय विवाहाची वातावरण निर्मिती आज समाजातुन होतांना दिसत आहे. पुढील काही वर्षात जाती धर्माची बंधने शिथिल होऊन धर्मव्यवस्थेत फार मोठा बदल होतांना दिसुन येईल. हा आंतरजातीय विवाहाला फार प्रभावी उपाय असु शकेल.

१७. संशोधन विषयाची उद्दिष्टये :

१. मराठवाड्यातील आंतरजातीय विवाहित स्त्री–पुरूषांना समाजात कशी वागणुक दिली जाते याचा अभ्यास करणे.

२. मराठवाड्यातील आंतरजातीय जोडप्यांच्या कुटुंबाकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन चा अभ्यास करणे.

३. मराठवाड्यातील आंतरजातीय जोडप्यांवर शासकीय संस्था व कर्मचाऱ्यांचा बघण्याचा दृष्टीकोन व कामाच्या जागी त्यांच्याकडे चा अभ्यास करणे.

४. मराठवाड्यातील आंतरजातीय जोडप्यांवर सामाजिक, मानसिक, आर्थिक, राजकीय, परिणामांचा अभ्यास करणे.

५. मराठवाड्यातील आंतरजातीय जोडप्यांला समाजात कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते? यांचा अभ्यास करणे.

६. मराठवाड्यातील आंतरजातीय जोडप्यांला सामाजिक परिणामाला सामोरे जाउन त्यांना त्यांचे जीवन नकोसे वाटण्यासाठी कोणत्या गोष्टी कारणीभुत असतील याचा अभ्यास करणे.

७. आंतरजातीय विवाहीत जोडप्याला आत्महत्या व हत्या करण्यास सामाजिक वातावरण कसे प्रर्वतक करणाऱ्या समस्या या ाटकांचा अभ्यास करणे.

१६. संशोधन विषयाची गृहितकृत्ये :

१. मराठवाड्यातील आंतरजातीय विवाह हे पारंपारीक विवाह पेक्षा अधिक जास्त टिकाउ आहे. तसेच आंतरजातीय विवाह होण्याचे प्रमाण हे वाढत आहे.

२. मराठवाड्यातील आंतरजातीय विवाहीत जोडप्याच्या होणाऱ्या हत्या व आत्महत्यास सामाजिक वातावरण हे एक प्रमुख कारण आहे.

३. मराठवाड्यातील आंतरजातीय विवाह हे भारतातील जटील व गुंतागुतीची जातीय व्यवस्था नष्ट करण्यास प्रमुख कारण ठरत आहे.

४. आंतरजातीय विवाह करणाऱ्या मराठवाडयातील विवाहीत जोडप्याला समाजाकडून मिळणारी वागणूक त्याच्या अधिकारांचे हनन करणारी आहे.

५. आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी शासन व्यवस्था कार्यरत आहे.

१७. संशोधन विषयाचे महत्व :

विवाह ही समाजातील एक अतिशय अनिवार्य अशी सामाजिक संस्था आहे. हिंदु धर्मातील सोळाव्या संस्कारापैकी विवाह एक महत्वाचा संस्कार मानला जातो. या संस्कारातून व्यक्तीची व्यक्तीची लैंगिक गरज भागवली जाते. त्यातून होणाऱ्या संततीचे पालन पोषण केले जाते. व यातुन समाजाचे सातत्य पुर्ण राहते. विवाह संस्थेचा एक महत्वाचा उद्देश म्हणजे व्यक्तीगत व सामाजिक पातळीवर या गरजा मुलभुत स्वरूपांच्या असल्या तरीही विवाहसंस्थेत पिढयान–पिढया चालत आलेली ही एक प्रक्रिया आहे. आंतरजातीय विवाह ही एक सामाजिक ऐक्य साधण्याचा दुवा म्हणून ओळखले जावू शकते. आंतरजातीय विवाहमुळे समाजातील तेढ दुर होवुन दोन समाज विवाहाच्या माध्यमातुन एकत्र येवुन सकोल्याने वागतील असे आपण म्हणू शकतो आणि आंतरजातीय विवाहामुळे दोन जातीतील संस्कृती व इतर विचारांची देवाण घेवाण घेत एक.

प्रस्तुत अभ्यास विषय हा भारतीय समता मुलक समाज धिष्ठत रूमाकिरायाने समाजामध्ये धर्मा–धर्मामध्ये ऐकय व समानता निर्माण करण्यासाठी एक महत्वाचा घटक ठरतो. म्हणून संशोधकाने प्रस्तुत विषयाची अभ्यासासाठी निवड केलेली आहे.

१८. नमुना निवड पध्दती :

नमुना हा विश्व किंवा समग्रातुन निवडण्यात आलेला भाग असतो. या विश्वातील एका घटकास किंवा सदस्यास व्यष्टी असे म्हणतात. विश्व किंवा समग्रातील फक्त काही प्रतिनीधीक एककांची निवड करणे म्हणजेच नमुना निवड होय. या बाबतीत Goode and Hott या बाबतीत असे नमुद करतात की, नमुना त्यातील **नावांप्रमाणेच असे नमुद करतात एक विस्तृत समुहाचा लघु प्रतिनिधी आहे.** मागील व्याख्यावरून विश्व किंवा समग्रातील एकुण एककांपैकी काही प्रतिनिधीक एककांची निवड करणे म्हणजे नमुना निवड होय.

वरील दृष्टीकोन लक्षात घेउन संशोधकाने पैसा, वेळ, श्रम यांचा विचार करून संशोधनातील संभाव्य व गैरसंभाव्य नमुना निवड प्रकारातील निधीअष्टांश नमुना निवड पध्दती (Quotasmapling) संशोधकाने उपयोगत आणली. ८० आंतरजातीय विवाहीत जोडप्यांचा नमुण्यात अंर्तभाव केला आहे. या ठिकाणी एकक ही संज्ञा जोडण्यासाठी उपयोगात आणली असुन ८० ही संख्या आकाराने बरीच मोठी असल्यामुळे समग्रातील प्रतिनिधीत्व करण्याची तिची कुवत शंकास्पद नाही हे निश्चत करण्यात आले आहे.

ज्या समग्राबाबत काही विधाने व निष्कर्ष मांडु इच्छितो त्या सामग्राचे प्रतिरू‍ ठरेल अशा नमुना निवडणे कोटा पध्दतीचे प्रमुख उद्दिष्ट असते. समग्रातील विविध घटकांना लोकसंख्येत ज्या प्रमाणे आढतात. त्यांचप्रमाणे नमुन्यातही प्रतिनिधीत्व मिळावे यांची कोटा पध्दती विश्वसार्हता असते असे म्हटले जाते. कोटा निवड पध्दतीत करण्याच्या तीन पध्दती आहेत.

१. ज्या लक्षणांच्या दृष्टीने महत्वपूर्ण वाटतात अशा गुणधर्माच्या आधारे त्यांचे गट पाडले जातात.

२. प्रत्येक वर्गात व्यक्तीचे एककांचे प्रमाण काय हे समग्राच्या ज्ञान गृहीत व अनुमानीत घडणीप्रमाणे ठरविले जातात.
३. प्रत्येक मुलाखतकार किंवा निरीक्षकांस उत्तरदात्यांना ठराविक कोटा दिला जातो. किंवा प्रत्येकांने किती व्यक्तींची मुलाखत घ्यायची हे पूर्वीच ठरविण्यात येते. तरीही मुलाखतकारास किंवा मुलाखतीसाठी वा निरीक्षणांसाठी कोनाची निवड होईल व कोनाची निवड होणार नाही हे मुलाखतकारांच्या किंवा निरीक्षकांच्या वैयक्तिक निर्णयावर अवलंबुन असते. प्रमाणानुसार पूर्व नमुण्यात त्यांच्या वर्गाच्या नमुना प्रतिकृतीला व नमुण्यास स्थान मिळेल यांची काळजी घेतली जाते.

१९. तथ्य संकलन पध्दती :

समग्राची निवड केलयानंतर संशोधकांनी या समग्रातुन तथ्य संकलन करण्यासाठी पुढील प्रमाणे तयि संकलन पध्दती निवडली. समग्रातील व्यष्टीनुसार अध्ययन करून तथ्य गोळा करण्यासाठी संशोधकानी तथ्य संकलनातील विविध पध्दतीचा अभ्यास करून त्यातील अभ्यासाला अनुरूप पध्दती लक्ष्यात घेतल्या, तथ्यांचे संकलन करण्यापूर्वी तथ्य संकलनाची व्याख्या करणे सोयीस्कर ठरते.

दुखींमच्या मते, सामाजिक तथ्य व्यवहारांचा विचांर, अनुभव व क्रिया असा पक्ष आहे की, ज्यांचे निरीक्षण वस्तुनिष्ठ स्वरूपात शक्य आहे. आणि जे एका विशिष्ट तऱ्हेने व्यवहार करण्यास बाहय करते. सामाजिक शास्त्रात तथ्ये हे सर्वमान्य व्यक्तींच्या विचारलेंल्या व त्यांच्या समोर प्रस्तुत केल्या गेलेल्या चेतकांच्या संदर्भात त्यांनी व्यक्त केलेल्या प्रत्युतरांच्या व प्रतिक्रियांच्या नोंदीच्या स्वरूपांत असतात.

इतर शास्त्राप्रमाणे सामाजिक शास्त्रात ही ज्ञानेन्द्रियांच्या आधारे होणारा स्थितीबोधवा निरीखण हाच तथ्य प्राप्तीचा आधार आहे. तथ्य संकलनातील प्रामाणिकता व विश्वसनियतेवरच संशोधनाचे महत्व अवलंबुन असते वरील दृष्टीकोन लक्ष्यात घेतला आणि पुढील संकलन तंत्राची निवड केली.

२०. संशोधन क्षेत्राची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत संशोधन हे सामाजिक पर्यावरणाचे परिणाम भोगलेल्या मराठवाडयातील (आकडा) निवडक आंतरजातिय विवाहीत जोडप्यांपुरते मर्यादीत असेल.

२१. तथ्य संकलनाची प्राथमिक साधने :

- **निरीक्षण पध्दती :**

घटना व वर्तन घडत असतांना प्रत्यक्ष डोळयानी पाहुन जसेच्या तसे लिहुन ठेवणे वा लक्ष्यात ठेवणे म्हणजे निरीक्षण होय असे पोलीन यंग यांना म्हटले आहे. निरीक्षण पध्दतीचा वापर करून प्राथमिक स्वरूपाचे तथ्य संकलनासाठी मुलाखत घेतानाच संशोधकांनी उत्तरदात्यांच्या वस्त्या, निवासस्थाने, पुजास्थाने, घरातील वस्तु, देवदेवतांची चित्रे वागण्या बोलण्याचा व त्यांच्या राहणीच्या पध्दती इत्यादींच्या नोंदी करून ठेवण्यासाठी प्राथमिक स्वरूपांचे तथ्य संकलन तंत्र म्हणून निरीक्षण पध्दतीचा उपयोग केला.

- **मुलाखत तंत्र :**

उत्तरदात्यांना प्रश्नांची उत्तरे विचारून समस्या सोडविण्यास किंवा संबंधीत माहिती मिळविण्यास मुलाखत तंत्र महत्वाचे आहे. संशोधकांना देखील मुलाखत तंत्राचा वापर करून नांदेड जिल्हयातील आंतरजातीय विवाहीत जोडप्यांकडुन व उत्तरदात्यांकडुन (समग्रहातुन) माहिती संकलन केली. मुलाखतीव्दारे तथ्य संकलन करण्यासाठी संशोधकांनी दोन विद्यार्थ्यांची मदत घेतली. त्यांतील एक विद्यार्थी समाजशास्त्र व समाजकार्य या विशयात शिक्षण घेत आहेत. संशोधकाने या दोघांना संशोधन विषयी विशेष मार्गदर्शन करून त्यांना मुलाखत सुची समजावुन सांगितलेली आहे व स्वतः बरोबर घेऊन मुलाखत उत्तरदात्यांची घेतील त्यानंतर त्यांना काही फोटो काढुन मुलाखत घेण्यास सांगतील मुलाखत तंत्र म्हणजे दोन किंवा अधीक व्यक्तींमधील संवाद किंवा मौखीक प्रतिसाद असतो. या मुलाखतींकरीता एक मुलाखत सुची तयार

करेल मार्गदर्शकांकडुन ही सुची तिन वेळेस तपासुन घेतल्यानंतर सुचीप्रमाणे उत्तरदात्यांना प्रश्न विचारून मुलाखत अनुसुचतीत तथ्य संकलीत केले जाईल.

- **तथ्य संकलनाची दुय्यम साधने :**

संशोधक स्वतः हा अध्ययन क्षेत्रात जाउन संबंधीत समस्येच्या संबंधात जीवंत व्यक्तींकडुन मुलाखत अनुसुची किंवा प्रश्नावलींच्या सहायाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष निरीक्षणाव्दारे काही माहिती तथ्ये गोळा करतील त्यास प्राथमिक तथ्ये म्हणतात. प्राथमिक तथ्ये अधिक वस्तुनिष्ठ स्वरूपांचे असतात. जीवंत व्यक्ती व निरीक्षण ही प्राथमिक तथ्यांची स्त्रोत आहेत. प्राथमिक तथ्ये संसोधकाने स्वतः हा गोळा केलेली असतील ती लिखीत स्वरूपांत व अलिखीत स्वरूपांत असतील. त्या तथ्यांत प्रलेख, अहवाल, पत्रे, सांख्यिकी, दैनंदीनी हस्तलिखीते इत्यांदी विषयक माहिती संशोधनास मदत करेल.

मराठवाडा विभागावरील अभ्यास विषयाची माहिती गोळा करण्यासाठी संशोधकानी स्वतः नांदेड ऐतिहासिक व भौगोलीक लोकसंख्या व कार्यालयीन माहिती करीता पुस्तके, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, ग्रामपंचायती रेकॉर्ड, इत्यादी संबंधीच्या संदर्भ ग्रंथ वाचुन अध्ययनास वापर केलेला असेल.

प्रस्तुत विषयी माहिती वरीलप्रमाणे निरीखण मुलाखत व दुय्यम साधनाव्दारे गोळा करण्यात येईल. मुलाखत घेताना अनेक अडचणीना तोंड द्यावे लागेल. कारण मुलाखत घेतेवेळी सुरूवातीस उत्तरदात्यांच्या मनात संशय निर्माण होतील. मुलाखत सुचीतील इतक्या प्रश्नांची माहिती आजपर्यंत कोणीही विचारली नव्हती. हा सरकारी उपक्रम नसावा काही जनाना वाटेल असे. काही जनांना काही उत्तरदात्यांनी कामात गुंतलेल्या असल्यामुळे वेळेवर भेटत नसत. काही जन माहिती देण्यास टाळाटाळ करत असे. त्यामुळे मुलाखतींची वेळ संध्याकाळी तर सकाळी ७ ते ९ अशी ठेवण्यात येईल. संशोधक स्वतः जिल्हयाच्या व विद्यापीठ परीसरात राहत असल्यामुळे उत्तरदात्यांच्या शंका दुर करीत व अडचणीवर मात करीत आहेत. संशोधनाचा उद्देश व महत्व समजावुन सांगत असत. कार्यालयीन माहिती व सांख्यिकी माहिती गोळा करीत असतांना कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा हेळसांड व बेजबाबदारी व

निर्लज्य समाजकल्यान अधिकारी जिल्हा–परिषद नांदेड त्यावेळचे यांनी कुठल्याही पध्दतीची मदत संशोधकाला केली नसेल. **स्नोबॉल संशोधन पध्दती** वापरून संशोधकांनी आपल्या संशोधनास न्याय देण्याचा प्रयत्न करेल. संशोधनाचे महत्व पटवुन देऊन प्रेमपुर्वक विनंती करून दुय्यम माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

२२. संशोधन आराखडा :

निष्कर्षाची संशोधन उद्दिष्टे यांची संबंधता व संशोधन कार्यात मितव्ययता यांची सागंड घालता येईल. अशाप्रकारे तथ्याची नियोजीत व्यवस्था म्हणजे संशोधन आराखडा होय. यावरून प्रस्तुत अध्ययनात उद्दिष्ट म्हणजेच आंतरजातीय विवाहीत जोडप्यांवरील सामाजिक पर्यावरणाचा, परिणामांचा शोध घेता येईल. यामुळे सामाजिक प्र्यावरणाचे दुःख भोगलेल्या आंतरजातीय विवाहीत जोडप्यांच्या जीवनातील अस्वस्थता निर्माण करणाऱ्या सामाजिक परिणामांना शोधुन काढता येईल. या अध्ययनासाठी संशोधाकांनी अन्वेषणात्मक आराखडा निवडला. या आराखडयामुळे गृहितकृत्यांची संशोधनानंतर मांडणी करण्यांस व समस्येंच सुस्पष्ट स्पष्टीकरण करण्यास मदत होईल.

प्रस्तुत अभ्यासविषयासाठी संशोधकाने खालील प्रकरणाचा समावेश केलेला असेल.

प्रकरण पहिले : प्रस्तावना व संदर्भ साहित्याचा आराखडा

प्रकरण दुसरे : संशोधन पध्दती व आंतरजातीय विवाहाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रकरण तिसरे : आंतरजातीय विवाहाचे पारंपारिक स्वरूप

प्रकरण चौथे : तथ्यांचे विश्लेषण व सर्वेक्षणात्मक अभ्यास

प्रकरण पाचवे : सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भग्रंथसूची :

१. भांडार र पु.ल. (१९८७), **संशोधन पध्दती,** महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपुर, पान क्र.१

२. भांडार र पु.ल. (१९८७), **उपरोक्त** पान क्र.३

३. भांडार र पु.ल. (१९८७), **उपरोक्त** पान क्र.१३४

४. आगलावे प्रदिप,(२०००द्ध, **सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे,** श्री साईनाथ प्रकाशन नागपुर पान क्र.१६५

५. आगलावे प्रदिप,(२०००), **उपरोक्त** पान क्र.१८१

६. भांडार र पु.ल. (१९८७), **संशोधन पध्दती**पान क्र.३९४

७. आगलावे प्रदिप, (२०००), **सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे,** श्री साईनाथ प्रकाशन नागपुर पान क्र.१९९

८. भांडार र पु.ल. (१९८७), **संशोधन पध्दती,** महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपुर, पान क्र.२१३

९. भांडार र पु.ल. (१९८७), **उपरोक्त,**पान क्र.२१३

१०. भांडार र पु.ल. (१९८७), **उपरोक्त,** पान क्र.२१३

संशोधक

धम्मपाल विठलराव वाढवे

एम.फिल.(समाजकार्य)

सामाजिक शास्त्र संकुल स्वा.रा.ती.मराठवाडा

विद्यापिठ जि.नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.अशोक वल्लेकर

जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय

सिडको नविन नांदेड